आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार, दिनांक २९ मार्च २०२४

ठळक बातम्या

- गव्हाची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी गव्हाच्यासाठ्याची माहिती दर आठवड्याला अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे सर्व व्यापाऱ्यांना केंद्राचे आदेश.
- २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यापासून आजपर्यंत सी-व्हिजिलला ७९ हजारांहून अधिक तक्रारी प्राप्त.
- गडचिरोली जिल्ह्यात पोलिस खबऱ्या असल्याच्या संशयावरून नक्षल्यांनी केली एकाची हत्या.
- नागपूरचं कमाल तापमान ४० अंशांच्या पलीकडं; प्रशासनाकडून उष्माघात प्रतिबंधविषयक उपाययोजना जारी.

*****

गव्हाची साठेबाजी

गव्हाची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी सरकारनं सर्व छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांना गव्हाचा साठा जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत. किरकोळ आणि घाऊक विक्रेते, मॉल, रिटेल चेन आणि प्रक्रिया करणाऱ्यांना हे साठे १ एप्रिलपासून अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाच्या **evegoils.nic.in** या संकेतस्थळावर नमूद करावे लागतील. त्यानंतर पुढील आदेशापर्यंत दर शुक्रवारी साठ्यांची माहिती अपडेट करावी लागणार आहे. नोंदणी न केलेल्यांना या संकेतस्थळावर नोंदणी करून साठ्याची माहिती द्यावी लागेल. सध्या तांदळाच्या साठ्याची नोंदणी करणं बंधनकारक आहे.

सी-विजिल

भारतीय निवडणूक आयोगाचं **C-Vigil** ॲप हे निवडणूक आचारसंहितेचं उल्लंघन करण्याच्या घटनांबाबत तक्रार नोंदवण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेलं एक प्रभावी साधन बनलं आहे. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यापासून आजपर्यंत या अ‍ॅपवर ७९ हजारांहून अधिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यापैकी ९९% पेक्षा जास्त तक्रारींचं निराकरण करण्यात आलं आहे. यापैकी जवळपास ८९% तक्रारींचं नोंदणी झाल्यानंतर केवळ १०० मिनिटांत निराकरण करण्यात आलं आहे. गती आणि पारदर्शकता हे **C-Vigil** ॲपचे आधारस्तंभ आहेत. आजवर प्राप्त तक्रारींपैकी एकूण ७३ % तक्रारी या बेकायदेशीर होर्डिंग्ज आणि बॅनर्सच्या विरोधात आहेत. तर पैसे, भेटवस्तू आणि दारू वाटपाच्या संदर्भात चौदाशेहून अधिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. **C-Vigil** हे वापरकर्ता-अनुकूल आणि हताळण्यास सोपं ॲप्लिकेशन आहे, ते सतर्क नागरिकांना जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक अधिकारी आणि भरारी पथकांशी संपर्क साधण्यास

मदत करते. C-Vigil ॲपवर तक्रार नोंदवताच तक्रारदाराला एक युनिक आयडी मिळतो, ज्याद्वारे तक्रारदार व्यक्ती आपल्या मोबाईलवरून तक्रार निवारण प्रक्रियेचा मागोवा घेऊ शकते.

लोकसभा उमेदवारी

अमरावती लोकसभा मतदारसंघात आज प्रहार पक्षाच्या वतीनं माजी नगरसेवक दिनेश बूब यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे, तर महायुतीच्या वतीनं विद्यमान खासदार नवनीत राणा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. दिनेश बूब यांच्या उमेदवारीनं राजकारणात आता चौरंगी लढतीची शक्यता वर्तवली जात आहे.बुलढाणा जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून प्रा. नरेंद्र खेडेकर, महायुतीकडून विद्यमान खासदार प्रताप जाधव, तर वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मगर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती तसंच वंचित बहुजन आघाडी यांच्या तिरंगी लढतीसह अपक्षांनाही मोठं महत्त्व प्राप्त झालं आहे.

रश्मी बर्वे

रामटेक लोकसभा मतदारसंघात जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांच्या जागेवर आता त्यांचे पती श्यामकुमार दौलत बर्वे हे काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार राहणार आहेत. रश्मी बर्वे यांनी काल रात्री उशिरा पत्रकार परिषद घेत विरोधकांनी राजकीय षडयंत्र रचल्याचा आरोप केला.

देवळी विधानसभा

भारत निवडणूक आयोगाव्दारे वर्धा लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणाऱ्या वर्धा, देवळी आणि हिंगणघाट या विधानसभा मतदार संघासाठी खर्च निरीक्षक म्हणून के. जी अरुणराज यांना जबाबदारी देण्यात आली आहे. त्या अनुषंगानं देवळी विधानसभा मतदारसंघाच्या मुख्यालयी भेट देऊन निवडणूक खर्चाच्या संबंधित सर्व अधिकारी तसंच विविध पथकांचा आढावा त्यांनी घेतला. बैठकीनंतर अरुणराज यांनी देवळी तालुक्यातील शिरपूर (होरे) इथल्या चेकनाक्याच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली तसंच चेकनाक्यावरील नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना वाहनतपासणी बाबत सूचना दिल्या.

‘ऑल इंडिया जमियतूल कुरैश’

‘ऑल इंडिया जमियतूल कुरैश’ या मुस्लिम कुरैश समाजातील सामाजिक संघटनेनं नागपूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार नितीन गडकरी यांना समर्थन जाहीर केलं आहे. येत्या १२ एप्रिल रोजी गरीब नवाज नगर मैदानावर संघटनेचे अध्यक्ष अब्दुल गनी कुरेशी यांच्या नेतृत्वात गडकरी यांच्या समर्थनार्थ जाहीर सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. यासंदर्भातील निर्णय त्यांनी अलीकडंच पत्रकार परिषदेत

जाहीर केला. त्याचप्रमाणं नागपुरातील तेलगू भाषिक महासंघानं देखील एका पत्राच्या माध्यमातून गडकरी यांना लोकसभा निवडणुकीत पाठिंबा व्यक्त केला आहे. गडकरींना विनाशर्त पाठिंबा देण्यात येत असल्याचं तेलगू भाषिक महासंघांतर्गत येणाऱ्या १२ संघटनांनी म्हटलं आहे.

बिल गेट्स-मोदी

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा ही एक मोठी गरज असून, सरकार सर्व गावांना डिजिटल सुविधा पुरवत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं मायक्रोसॉफ्ट कंपनीचे संस्थापक बिल गेट्स यांच्याशी संवाद साधताना ते बोलत होते. कृषी, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानानं क्रांती होऊ शकते, असं त्यांनी नमूद केलं. लोकांमध्ये तंत्रज्ञानावरील विश्वास वाढवण्यासाठी सरकार सतत योगदान देत असून, डेटा सुरक्षा ही चिंतेची बाब असल्याचं ते म्हणाले. आर्टिफिशियलइंटेलिजन्स-एआय बद्दल देखील चिंता व्यक्त करत पंतप्रधानांनी योग्य प्रशिक्षणाशिवाय एआय कोणालाही दिलं गेलं, तर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता व्यक्त केली.

गुड फ्रायडे

प्रभू येशू ख्रिस्तांचा बलिदानाचा दिवस गुड फ्रायडे आज पाळला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त समाज माध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात, प्रभू येशूंचं बलिदान प्रत्येकाला दया आणि क्षमा वृत्ती वाढवण्याची सतत प्रेरणा देईल, असं म्हटलं आहे. गुड फ्रायडे निमित्त ठिकठिकाणच्या चर्चमध्ये प्रार्थनेसह मानवतेचा संदेश देण्यासाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

नक्षल

गडचिरोली जिल्ह्यातल्या अहेरी तालुक्यात ताडगाव-दामरंचा रस्त्यावर पोलिस खबऱ्या असल्याच्या संशयावरून नक्षल्यांनी एका व्यक्तीची हत्या केली. अशोक तलांडे असं मृत व्यक्तीचं नाव असून आज पहाटे त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी नक्षल्यांनी पत्रक टाकलं असून, हत्येचं कारण त्यात नमूद करण्यात आलं आहे. दरम्यान, अशोक हा पोलिसांचा खबऱ्या नव्हता, असं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

दूरसंचार विभाग

दूरसंचार विभागानं खोट्या कॉल संदर्भात एक मार्गदर्शक सूचना जारी केली आहे. दूरसंचार विभागाच्या नावानं नागरिकांना त्यांचे मोबाईल नंबर बंद केले जातील, अशा धमक्या असणारे खोटे कॉल येत असल्याचं दूरसंचार विभागानं म्हटलं आहे. परदेशी मोबाईल नंबरवरून येणाऱ्या फसव्या व्हॉट्सअ‍ॅप कॉलबद्दल दूरसंचार विभागानं लोकांना जागरूक केलं आहे. सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणूक करण्यासाठी गुन्हेगार अशा कॉलद्वारे वैयक्तिक माहिती चोरण्याचा प्रयत्न करत असून दूरसंचार विभागाकडून असे कॉल केले जात नसल्याचं विभागानं म्हटलं आहे.

## परिवहन नोंदणी

शासनानं ॲग्रीकल्चर ट्रॅक्टर, पॉवर टिलर, कंस्ट्रक्शन इक्विपमेंट व्हेइकल आणि कम्बाईन हार्वेस्टर या संवर्गातील नवीन वाहन नोंदणी विषयी वायप्रदूषण मानकं आणि इंजिन क्षमता या अनुषंगानं  नोंदणीकरिता वैधता जारी केली आहे. यानुसार या संवर्गातील वाहनांची नोंदणी ३१ मार्च २०२४ पूर्वी करणं आवश्यक असल्याचं उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे कळविण्यात आलं आहे.

## मतदार जागृती

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा आणि मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी  मतदार जागरूकता आणि सहभाग कार्यक्रम-स्वीप अंतर्गत नागपूर  जिल्ह्यामध्ये विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. मतदारांनी जास्तीत जास्त संख्येनं मतदान करीत 'मिशन डिस्टींक्शन' यशस्वी करण्याचं  आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केलं  आहे. स्वीपअंतर्गत कळमेश्वर इथं  सायकल रॅलीचं आयोजन करण्यात आलं तसंच बाजार चौकात पथनाट्याचं  सादरीकरण करण्यात आलं. विद्यालयांतून मतदार जागृती,  रॅली आणि  पोस्टर स्पर्धा, मतदार जनजागृती शपथ इत्यादी कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

## दुय्यम निबंधक कार्यालय

जनतेच्या सोयीच्या दृष्टीनं दस्त नोंदणीसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक- सह जिल्हा निबंधक कार्यालयं २९ ते ३१ मार्च  या सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशीही सुरू राहणार आहेत, अशी माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी ए.ए.तांदळे यांनी दिली आहे.

## इंडियन प्रिमियर लीग

इंडियन प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

## हवामान

नागपुरात गेल्या ४८ तासांत कमाल तापमान ४० अंश सेल्सियसपेक्षा अधिक नोंदविण्यात आलं. काल आणि आज नागपुरात ४० पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस इतकं तापमान नोंदविण्यात आलं आहे. दरम्यान वाढत्या उष्म्यापासून बचाव करण्यासाठी स्थानिक प्रशासनातर्फे खबरदारीची सूचना देण्यात आली असून सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा स्पर्धाविषयक नियम आणि सूचनाही जारी करण्यात आल्या आहेत. याशिवाय रुग्णालयात उष्माघात प्रतिबंधक उपाययोजना आणि उपचार सज्ज ठेवण्यात येत आहेत. याशिवाय विदर्भासह राज्यात सर्वाधिक तापमान अकोला आणि

वाशिम इथं ४२ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं आहे. अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर इथं कमाल तापमान ४१ अंश सेल्सियसच्या वर पोचलं आहे. उर्वरित विदर्भात तापमान ४० अंशाच्या आसपास आहे. दरम्यान, बुलढाणा, वाशीम, अकोला आणि यवतमाळ इथं आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे, तर नागपूर, वर्धा आणि यवतमाळ इथं आज आणि उद्या हलका पाऊस पडू शकतो, असं अंदाज प्रादेशिक हवामान केंद्रानं व्यक्त केला आहे.

*****